क्र.साप्रवि/मावक/सु.प.२८/न.क्र. /
महाराष्ट्र राज्य विद्युत् वितरण कंपनी मर्या.
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.

महावितरण

## प्रशासकीय परिपत्रक क्र. ५२ दिनांक २९/०५/२००६

विषय : मृत कर्मचा-यांच्या अवलंबितांची पात्रता निश्चित करतांना/मासिक द्रव्यलाभ मंजूर करतांना चारित्र्य व पुर्वचरित्र्याची पडताळणी पोलीस खात्याकडून न करण्याबाबत.

---

वरील विषयाबाबत मा.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित यांना कर्मचारी संघटनांमार्फत असे निदर्शनास आणून देण्यात आले आहे की, मृत कर्मचा-यांच्या अवलंबितांची शैक्षणिक अर्हता विचारात घेऊन योग्य पदासाठी पात्रता निश्चित करतांना/मासिक द्रव्यलाभ मंजूर करतांना काही कार्यालयांकडून संबंधितांचे चारित्र्य व पुर्वचरित्र्याची पडताळणी करण्यात येते. अशी प्रकरणे पोलीस खात्याकडे प्रलंबित रहातात, परिणामी त्या अवलंबितांची पात्रता निश्चित करणे/मासिक द्रव्यलाभ मंजूर करण्यासाठी पाठवावयाची प्रकरणे क्षेत्रिय कार्यालयांकडे प्रलंबित रहातात.

२. या संदर्भात असे निदर्शनास आणण्यात येते की, तत्कालीन म.रा.विद्युत् मंडळाने परिपत्रक क्र.१४८ दि.१७.९.१९७५ व परिपत्रक क्र. ३५८ दि. ३.१.१९८७ अन्वये सरळ सेवा भरतीद्वारे अस्थायी किंवा स्थायी नियुक्ती देण्यापूर्वी चारित्र्य व पुर्वचरित्र्याची पडताळणी करणेबाबतच्या सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

३. सबब, सर्व क्षेत्रिय कार्यालयातील संबंधित अधिका-यांना सुचित करण्यात येते की, मृत कर्मचा-यांच्या अवलंबितांची चारित्र्य व पुर्वचरित्र्याची पडताळणी त्यांची अस्थायी किंवा स्थायी नियुक्ती करण्या आगोदर करावी. मृत कर्मचा-यांच्या अवलंबितांची योग्य पदासाठी पात्रता निश्चित करतांना (Suitability) तसेच मासिक द्रव्यलाभ मंजूर करतांना त्यांच्या चारित्र्य व पुर्वचरित्र्याची पडताळणी करणे आवश्यक नाही. तसेच अशा कारणांमुळे प्रलंबित असलेली सर्व प्रकरणे तात्काळ संबंधित अधिका-यांकडे मंजुरीसाठी सादर करावीत.

४. वरील सूचनांचे तंतोतंत पालन करण्यात यावे.

५. सदरचे प्रशासकीय परिपत्रक मा.व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वीज वितरण कंपनी मर्यादित यांचे मंजुरीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

(सु.व.पाटील)
मुख्य महाव्यवस्थापक (क)

प्रती :
प्रेषण यादीनुसार कार्यकारी अभियंता व त्यावरील सर्व अधिकारी.